# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

Web Site : rdtenagpur.org.in


तातडीचे

क्रमांक :– तंशिस/प्राकाना/शैवि–३/प्राचार्य पद/२०११/ 2943

दि. 16 NOV 2011

प्रति,

प्राचार्य,

____________________

(सर्व विना अनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था)

विषय :– प्राचार्यांचे पद भरण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेली याचिका.

संदर्भ :– मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी/प्राचार्यांचे पद/२०११/५१०७, दि. २५/१०/२०११

सोबत मा. संचालकांचे संदर्भिय पत्राची प्रत आपल्या माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता सोबत जोडण्यांत येत आहे. सदर शासन पत्रासोबत सिव्हील अपिल नं. २७०४/२०११ या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि. २८.०३.२०११ रोजी पारीत केलेल्या आदेशाची प्रत जोडण्यांत येत आहे.

या संदर्भात आपणांस कळविण्यांत येते की, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे दाखल याचिका क्र. २२१६/२००६ च्या प्रकरणी मा. न्यायालयाने दिलेला निर्णय रद्यबातल ठरविला असून प्रचलित नियमानुसार प्राचार्यांचे पद तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तरी आपले संस्थेमध्ये प्राचार्यांचे पद भरण्याबाबत आपले संस्थेकडून काय कार्यवाही करण्यांत आली व करण्यांत येत आहे याबाबतचा आढावा सादर करण्यांत यावा व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील निर्णयानुसार आपले संस्थेतील प्राचार्यांची पदे रिक्त असल्यास, सदरहू रिक्त पद तातडीने कार्यवाही करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास सादर करावा, जेणेकरून सदरहू अहवाल संचालनालयास/शासनास सादर करणे शक्य होईल.

सहपत्र : वरीलप्रमाणे

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.

प्रत :– १) प्रोग्रामर, सदरहू पत्र व त्यासोबतचे मा. संचालकांचे पत्राची प्रत आपले कार्यालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत यावे.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई (का.क्र. २) यांना माहितीस सादर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/प्राचार्यांचे पद/२०११/५५७८
दि. 25 OCT 2011

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
नागपूर व अमरावती

विषय :- प्राचार्यांचे पद भरण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेली याचिका.

संदर्भ :- शासनाचे पत्र क्र. न्यायप्र २००९/प्र.क्र.९१/तांशि-४ दि. ०४ ऑक्टोबर, २०११.

उपरोक्त विषयासंदर्भाधिन शासनपत्राची प्रत आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सोबत जोडण्यात येत आहे. सदर शासन पत्रासोबत सिव्हिल अपिल नं. २७०४/२०११ या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी दि. २८.०३.२०११ रोजी पारित केलेल्या आदेशाची प्रत जोडण्यात आली आहे. कृपया त्याचे अवलोकन व्हावे.

प्रस्तुत प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, वरील आदेशान्वये मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर येथे दाखल याचिका क्र. २२१६/२००६ च्या प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेला निर्णय रद्दबातल ठरविला असून, सोबत शैक्षणिक संस्थांना प्रचलित नियमानुसार प्राचार्यांचे पद तातडीने भरण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने शासनाने संदर्भाधिन शासनपत्रान्वये संबंधित संचालनालयानी त्यांच्या अखत्यारितील सर्व महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांचे पद भरण्यासाठी संबंधित संस्थांकडून कार्यवाही करण्यात येत आहे किंवा कसे, याबाबत दक्ष राहणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने कार्यवाही करण्यास व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यास सूचित करण्यात आले आहे.

वरील बाब विचारात घेऊन आपण त्यानुसार आपल्या अखत्यारितील सर्व महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांचे पद भरण्यासाठी संबंधित संस्थांकडून काय कार्यवाही करण्यात येत आहे, याबाबतचा आढावा घ्यावा व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील निर्देशानुसार ज्या संस्थांमध्ये प्राचार्यांची पदे रिक्त आहेत अशा संस्थांना प्राचार्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत योग्य त्या सूचना संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात व प्रस्तुत

C:\...\letter.doc

8138
11 NOV 2011

प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. जेणेकरुन सदर अहवाल शासनास सादर करणे या कार्यालयास सुलभ होईल.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

प्रत :- श्री.भ.सं.वानखेडे, अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांना संदर्भाधिन शासनपत्राच्या अनुषंगाने माहितीस्तव अग्रेषित.

D:\sandhya\general letter.doc